# कोल्हापूर महानगरपालिका

## जाहीर प्रसिद्धीकरण

क्र. १ दि. २४/१०/२०२५

कोल्हापूर महानगरपालिका, हद्दीतील रेखांकनातील साधारणतः १४० व त्याहून अधिक खुल्या जागांना कोल्हापूर महानगरपालिकेच्या नावाची नोंद करणे अनुषंगाने तहसीलदार कार्यालय व कोल्हापूर महानगरपालिका संबंधित विभाग यांच्यामध्ये समन्वय ठेऊन रेखांकनातील खुल्या जागांना मिळकत पत्रिकेवर **कोल्हापूर महानगरपालिकेच्या** नावाची नोंद करणे कामासाठी **सेवा निवृत्त** नायब तहसीलदार, दर्जाच्या पदाचा किमान १० वर्षे अनुभव असलेला **अथवा** तहसीलदार, दर्जाच्या पदाचा किमान ५ वर्षे अनुभव असलेला सेवा निवृत्त अधिकारी यांचेकडून सेवा करार पद्धतीने ६ महिने कालावधी करिता भरणेकामी मुलाखतीसाठी अर्ज मागविणेत येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| मानधन | : | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे दि. १० जून, २०२५ चे शासन निर्णयानुसार. |
| पदसंख्या | : | १ |
| कालावधी | : | अधिकतम सहा महिने |
| पात्रता व अनुभव (सेवा निवृत्त) | : | तहसीलदार, दर्जाच्या पदाचा किमान ५ वर्षे अनुभव.<br>नायब तहसीलदार, दर्जाच्या पदाचा किमान १० वर्षे अनुभव. |
| वयोमर्यादा | : | सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ६५ वर्षे पर्यंत. |

**सर्वसाधारण सूचना :**

१. वरील कामासाठी नमूद अनुभव धारण करीत असलेस दिनांक ०६/११/२०२५ इ. रोजी पर्यंत कोल्हापूर महानगरपालिका, मुख्य इमारत ब्युरो व नोंदणी विभाग, कोल्हापूर येथे सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० या कार्यालयीन वेळेत सर्व मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतिसह अर्ज सादर करणेचा आहे. अथवा labourofficerkmc@gmail.com या ईमेल वर मूळ कागदपत्रे अॅटॅचमेंट स्वरुपात अपलोड करावयाची आहेत. मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज ग्राह्य समजले जाणार नाहीत.

२. अर्जदारांची पात्र/अपात्र यादी दि. १४/११/२०२५ इ. रोजी को.म.न.पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

३. अर्ज सादर करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी आपला भ्रमणध्वनी क्रमांक व ई मेल आय. डी. न चुकता अर्जावर नमूद करण्याचा आहे.

४. नियुक्ती करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा रु. १००/- चे स्टॅंप पेपर वर प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.

५. ही नियुक्ती सेवा करार पद्धतीने असलेने को.म.न.पा. कायम सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.

६. मुलाखतीसाठी अधिकाऱ्यांनी स्वःखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित राहणेचे आहे. मुलाखतीची तारीख व वेळ अलाहिदा स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

७. सदरची नियुक्ती कोणत्याही कारणास्तव रद्द करणे बाबतचे अधिकार मा. प्रशासक यांना राहतील. याबाबत सविस्तर अटी/शर्ती Web.kolhapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत आल्या आहेत.

मा. प्रशासक यांचे मान्यतेने }

स्वाक्षरी
(शिल्पा दरेकर)
अतिरिक्त आयुक्त
कोल्हापूर महानगरपालिका